
शासनमुक्त, शोषणरहित, वर्गहीन, अहिंसक
समाज-रचनेसाठी

# विनोबांचा

# सर्वोदय-विचार



# प्रास्ताविक

विनोबांच्याच शब्दात संकलित व संपादित करून सर्वोदय-विचार मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

गांधीजींनी 'सर्वोदय' नावाची लहानशी पुस्तिका लिहिली.गांधींचा हा सर्वोदय-विचार विनोबांनी अधिक स्पष्ट केला व तो स्वातंत्र्योत्तर काळात नव्या परिस्थितीत लागू करून दाखविला.

विनोबांनी केवळ सर्वोदयाचे तत्त्वज्ञानच सांगितलेले नाही तर हे तत्त्वज्ञान व्यक्तिगत जीवनात आणि सार्वजनिक जीवनात उतरवण्यासाठी अनेक कार्यक्रम दिले. व शुद्ध सर्वोदय तत्त्वज्ञान व्यवहार्य करून दाखवले.

'सर्वोदय' हे दर्शन आहे, जीवनशैली आहे, व्यवहारनीती आहे व उपचार पद्धतीही आहे. म्हणूनच सर्वोदय-विचार स्थलकालातीत आहे.

सर्वोदय तत्त्वज्ञानाचा पाया एकादश-व्रते आहेत.या एकादश-व्रतांवर ज्याची श्रद्धा आहे आणि त्यांचे पालन करण्याचा जो प्रयत्न करतो तो सर्वोदयी आहे! त्यामुळे सर्वोदयी होण्यासाठी कुठल्याही संघटनेची व संस्थेची गरज नाही.

विनोबा म्हणतात," संस्था वाढवणे माझे लक्ष्य नाही. मी हेच चाहतो की जीवनाला दिशा देणारे विचार स्वतःच्या जीवनात बाणवावे आणि इतरांनाही ते समजवावे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात तो विचार दाखल झाला तर तो सहजच पसरेल. त्या ऐवजी

जर संस्था उभी केली तर त्यात स्पर्धा अभिनिवेश प्रकट होऊ शकतो, व मला हे नको आहे."

सर्वोदयाचा मंत्र आहे 'जय जगत्'! सर्वोदयाचे सारे तत्त्वज्ञान या एकाच मंत्रात सामावले आहे. 'जय जगत्' मंत्र म्हणजे विनोबांचा संदेश आहे, उपदेश आहे, आदेश आहे. जगाला संदेश, भारताला उपदेश आणि आपल्या अनुयायांना आदेश आहे!!

30 ऑक्टोबर, 2020, वि.प्र.दिवाण

# अनुक्रमणिका


1. सर्वोदयाचे तत्वज्ञान
2. सर्वोदयाचा पाया
3. विचार शासन
4. शासनमुक्त समाज-रचना
5. लोकशाहीत सहभाग
6. राजकीय पक्षांचे स्वरूप
7. निवडणुकीबाबतची भूमिका
8. राजनीती नव्हे लोकनीती
9. सहकार, असहकार आणि प्रतिकार
10. सत्याग्रह-विचार
11. अर्थ-विचार
12. संरक्षण-नीती
13. धर्म-विचार
14. अध्यात्म-दृष्टी
15. वैज्ञानिक-दृष्टी
16. जातिअंत
17. संस्था व संघटना
18.कार्यकर्ता

# 1 सर्वोदयाचे तत्त्वज्ञान

महात्मा गांधींनी रस्किनच्या 'अन्टु धिस लास्ट' या पुस्तिकेचा अनुवाद करून त्याला 'सर्वोदय' नाव दिले. पण त्याही आधी 'सर्वोदय' शब्दाचा घोष, अडीच हजार वर्षांपूर्वी महावीरांनी केला होता. त्यामुळे 'सर्वोदय' शब्दाला व विचाराला अडीच हजार वर्षांची महान परंपरा आहे. महात्मा गांधी व विनोबा यांनी आपल्या कृतीने कालोचित अर्थ सर्वोदय शब्दात दाखल केला.

विनोबा म्हणतात," जर 'सर्वोदय' शब्द आला नसता तर स्वराज्य प्राप्तीनंतर एक तर आम्ही ध्येयहीन बनलो असतो किंवा चुकीच्या ध्येयात सापडलो असतो. आमचे ध्येय काय असायला हवे याचे नेमके दर्शन 'सर्वोदय' शब्द करवितो. 'सर्वोदय' शब्द हा आम्हाला आमच्या व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात प्रेरणा देणारा शब्द आहे."

आधी सर्वांचा उदय व्हावा त्यातच माझाही उदय आहे. सर्वांचा उदय जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत माझ्या उदयाची मला इच्छा नाही. सर्वांच्या कल्याणासाठी त्याग करण्यास तयार असले पाहिजे, असा अत्यंत उदात्त विचार सर्वोदयाच्या मुळाशी आहे.

मी दुसऱ्यांमध्ये आणि दुसरे माझ्यामध्ये आहेत. अशा समभावनेने दुसऱ्यांच्या विकासात स्वतःचा अभ्युदय पाहणे, ही सर्वोदयाची समग्र दृष्टी आहे. सर्वोदय तत्त्वज्ञानाचा एकूण विचार

समन्वयाचा आहे. म्हणजे सर्व विचारांचा मेळ घालण्याची आणि त्यांना एकत्र आणण्याची शक्ती सर्वोदय विचारात आहेत.

'सर्वोदय' शब्दाचा अर्थ 'अंत्योदय' शब्दापेक्षा व्यापक आहे. अंत्योदय शब्दात इतर सर्वांचा उदय झाल्याचे सूचित होते. वस्तुस्थिती तशी नाही. श्रीमंतांचे पतन झाले आहे. हे पतन नैतिक व आध्यात्मिक असे दुहेरी आहे. त्यांनी आपली मालमत्ता शोषणाने, आणि म्हणूनच असत्य व हिंसेने मिळवलेली आहे. श्रीमंतांचे पतन झाले आहे. व गरीबांचे उत्थान कधीच झालेले नाही. त्यामुळे श्रीमंत व गरीब दोघांच्याही उध्दाराची गरज आहे.

## 2.सर्वोदयचा पाया

'एकादश-व्रत' अर्थात; अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह, शरीरश्रम, अस्वाद, अभय, सर्वधर्मसमानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना ही अकरा व्रते सर्वोदय तत्वज्ञानाचा पाया आहे. व्यक्तिगत जीवनाइतकेच समाज-जीवनालाही एकादश-व्रते लागू आहेत.एकादश-व्रतांचे पालन केल्यानेच व्यक्तीला व समाजाला स्वास्थ प्राप्त होईल, अशी सर्वोदयाची पक्की धारणा आहे.

सर्वोदय तत्त्वज्ञानाचा पाया व सार 'एकादश-व्रत' आहेत. ही अकराव्रते विनोबांनी पद्यात गुंफली आहेत-

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मीं समानत्व स्वदेशी स्पर्श-भावना
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रत-निश्चये ।।

या एकादश-व्रतांवर श्रध्दा ठेवणे व ही व्रते जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच 'सर्वोदयी' होणे !!

साध्य आणि साधन दोन्ही शुद्ध असले पाहिजे. स्व-परिवर्तनाकडून समाज-परिवर्तन ही सर्वोदयाची दिशा आहे.

## 3.विचार-शासन

विचार समजून घेणे आणि विचार समजावून सांगणे, विचार पटल्याशिवाय ते मान्य न करणे आणि विचार समजून न घेता आपले म्हणणे कबूल केले तर दु:खी होणे, विचार समजावून संतुष्ट राहणे म्हणजे 'विचार-शासन'. विचारावर विश्वास, विचारानेच काम आणि विचाराची सत्ता अशी ही विनोबांची विचारपद्धती आहे..

आपला विचार समोरच्याला जरूर पटवून द्यावा, समजावून सांगावा व हीच आपली मर्यादा आहे. विचाराचे आक्रमण नको, त्याने समोरचाच्या विचार-शक्तीवर अविश्वास दर्शविल्यासारखा होईल. पुन्हा त्यात अहंकार व हिंसाही आहे. जर ते विचार लोकांना पटले तर ते स्विकारतील व त्यानुसार अंमलही करतील. आपण केवळ निमित्तमात्र आहोत. विचार आपल्या द्वारे प्रकट झाला इतकेच. म्हणून आपले काम विचार पेरणे, सांगणे इथपर्यंतच मर्यादित आहे. जनतेला नम्रतापूर्वक विचार समजावत जावे, याउपर आमच्या डोक्यावर भार नाहीच. विचारांचा स्वीकार अस्वीकार करण्याचा हक्क जनतेला आहे.

## 4.शासनमुक्त समाज-रचना

शासनमुक्त, शोषणरहीत, वर्गहीन, अहिंसक समाज-रचना हा सर्वोदयाचा अंतिम आदर्श आहेत. शासन आणि शोषण हे समाजातील हिंसेचे दोन मोठे प्रकार आहेत. सरकारच आज समाजाचे शोषण करणारी व हिंसक संस्था बनली आहे. म्हणून समाजाने सरकारच्या सत्तेतून मुक्त झाले पाहिजे. प्रत्येकाने स्वयंशासन स्वीकारले व प्रत्येक जण विवेकबुद्धीने चालला तर समाज शासनमुक्त होऊ शकेल.

शासनमुक्त-समाज ही आदर्श समाज-रचना आहे. अशी समाज-रचना पूर्वी कधीही नव्हती; आज अस्तित्वात नाही आणि भविष्यातही कदाचित पूर्णपणे साकार होणार नाही. परंतु तरीही या आदर्शाचे मोल कमी नाही. अप्राप्य असला तरी याच आदर्शाकडे वाटचाल सुरु ठेवली पाहिजे.

जनतेच्या नैतिक शक्तीची पातळी जसजशी उंचावत जाईल तसतशी राज्यसत्तेची सत्ता चालविण्याच्या शक्तीची पातळी क्षीण होत जाईल, म्हणजे तिची सत्ता कमी कमी होत जाईल. अखेर तर तिचे अस्तित्वच राहणार नाही . शासनहीन समाज आमचा आदर्श नाही. आमची तर इच्छा शासनहीनता जाऊन सुशासन व्हावे व नंतर तेही जाऊन शासनमुक्त समाज बनावा अशी असेल. अशा समाजात दंडाची , शिक्षेची गरजच राहणार नाही अशा समाजातील लोक स्वत: होऊन त्या नैतिक विचाराप्रमाणे असतील-तो समाज स्वयंशासित असेल.

## 5.लोकशाहीत सहभाग

शासनमुक्त समाज-रचना हा सर्वोदयाचा आदर्श असला तरीही शासनाचे अस्तित्व व त्याचे आजचे स्वरूप ही वास्तविकता स्वीकारावी लागते.

शासन हे कृत्रिमरीत्या लादलेली वस्तू नसून माणसाच्या मूलभूत गरजांना मिळालेला तो नैसर्गिक प्रतिसाद आहे.

शासनव्यवस्थेची ही वास्तविकता स्वीकारूनही शासनाचे दमनकारी व हिंसक स्वरूप उरतेच. शासनाचे दमनकारी स्वरूप सौम्य करून घेणे व हिंसेची धार बोथट करणे इतकेच आजच्या स्थितीत आपल्या हातात असेल तर, आजच्या लोकशाही व्यवस्थेत सहभागी होत जाणे हाच सर्वकष-सत्तेला आवर घालण्याचा व तिचे निर्मूलन करण्याचा मार्ग आहे.

सर्वोदय कोणत्याही एका पक्षाशी बांधील नाही. राजकीय सत्तेसाठी व पदासाठी होणाऱ्या स्पर्धेत सर्वोदय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहभागी होणार नाही.पण याचा अर्थ असा मात्र नाही की राजकीय क्षेत्रात वा लोकशाहीच्या व तिच्या विविध संस्थांच्या कार्यवाहीत जे काही घडते त्याच्याशी सर्वोदयाचा मुळीच संबंध नाही.

जे सरकार न्यूनतम राज्य करते, ते सर्वोत्तम असते हा विचार जनतेच्या सहभागी लोकशाहीचा प्राणभूत आधार आहे.

## 6.राजकीय पक्षांचे स्वरूप

आजचे राजकीय-पक्षांचे स्वरूप समजून घेणे गरजेचे आहे. संघटना, संपत्ती व प्रचार यांच्या बळावर राजकीय पक्ष, स्वतःला जनतेवर लादत असतात. लोकशाही प्रत्यक्षात पक्षशाही व जनतेचे राज्य परिणामतः पक्षाचे राज्य होते. आणि पक्षाचे राज्य हे मूठभर नेत्यांचे होते.

जनतेचे उमेदारही जनता ऊभे करत नाही तर राजकीय पक्ष ऊभे करतात. पक्ष आपले उमेदवार उभे करून, त्यांनाच मत देणे मतदारांना भाग पाडतात व मतदारांचा मतदानाचा अधिकार काढून घेतात.

पक्षपद्धती, जनतेची शक्ती आणि उपक्रमशीलता नाहीशी करते. जनतेचे सामर्थ्य व पुढाकार वाढेल असे कार्य पक्ष करीत नाही. राजकीय पक्षांना फक्त सत्ता हवी असते. स्वतःकडे सत्ता घेऊन लोकांवर राज्य करणे एवढेच पक्षाचे ध्येय असते.

राजकीय पक्षांना जनतेला आपल्यामागे फरफटत न्यायचे असते. पक्षपद्धती लोकांना मेंढ्या करून सोडते. या मेंढ्यांचे सार्वभौम कार्य एकच असते; ते म्हणजे ठराविक कालावधीनंतर आपल्या कल्याणाची जबाबदारी घेणारा धनगर निवडून देणे!

मतदानाचा अधिकार देऊन, आपण आपले राज्य चालवतो असे समाधान, तसेच आपण आदर्श राज्यव्यवस्था चालवीत असल्याचा भ्रामक गर्व मतदारांच्या मनात पक्षपद्धती निर्माण करते. ऐक्याची गरज असते तिथे राजकीय पक्ष फूट पाडतात. जिथे मतभेद मिटवले

जावेत तिथे राजकीय पक्ष मतभेद वाढवतात. पक्ष, राष्ट्रीय-हितापेक्षा पक्ष-हिताला अधिक जपतात.

सत्तेसाठी आप्पलपोटेपणा व भ्रष्टाचार पक्षात अंगभूत असतो. निवडणूक पद्धती अती खर्चाची आणि भयानक उधळपट्टीची आहे. निवडणुकांना लागणारा अफाट पैसा पाहता, लोकशाही धनिकांकडे गहाण टाकली आहे.आणि हा खर्च कोणत्याही प्रकारे जनहितासाठी न होता उलट लोकशाहीला मारक होतो.लोकशिक्षण व प्रबोधन हे तर दूरच राहिले, उलट भावना भडकावून व विकार चेतवून मतदारांच्या विवेक-शक्तीला व विचारशक्तीला पक्षांतर्फे संमोहित केले जाते.

राजकीय पक्षांचे हे स्वरूप पाहता; सत्ता निरपेक्ष व निष्पक्ष राहणे तसेच राजकीय पक्षांपासून अंतर ठेवून रहाणे हे गरजेचे ठरते.

## 7.निवडणुकीबाबतची भूमिका

लोकशाही, जी आज पक्षनिष्ठ आहे ती लोकनिष्ठ बनविण्यासाठी सर्वोदयाला पक्षनिरपेक्ष व पक्षातीत भूमिका आवश्यक वाटते.

लोकशाहीत; सेना, न्यायव्यवस्था व प्रशासन हे जसे पक्षीय राजकारण व निवडणुकीबाबत तटस्थ असतात व त्यामुळेच लोकशाही टिकून आहे; जवळजवळ तशीच तटस्थतेची भूमिका सर्वोदयाची आहे.

पक्षीय राजकारण व निवडणुकीबाबत सर्वोदयाची भूमिका तटस्थतेची असली तरी राजकारण-विन्मुख नाही. सांप्रदायिक, धार्मिक, भाषिक, प्रांतिय अशा संकुचित राजकारण करणाऱ्यांना तसेच भ्रष्ट उमेदवारांना मतदान करू नये.

पक्षातीत राहून सर्वोदयी कार्यकर्त्यांनी मतदाता-प्रबोधन करण्यास हरकत नाही. पण शिक्षक जसा विद्‌यार्थ्यांना वर्षभर शिकवतो; मार्गदर्शन करतो; त्यांच्या प्रश्नांचे निरसन करतो; त्याला पुस्तके पुरवतो; परंतु परीक्षेच्या दिवशी मात्र जसा शिक्षक तटस्थ राहतो; तसेच सर्वोदयी कार्यकर्त्यांनी चार वर्षे मतदातांचे प्रबोधन करावे, मात्र निवडणुकीच्या काळात तटस्थ राहावे, अशी सर्वोदयाची भूमिका आहे.

## 8.राजनीती नव्हे लोकनीती

सर्वोदयाला राज्य नको प्राज्य हवे आहे. राजाचे असते ते 'राज्य' व प्रजेचे असते ते 'प्राज्य'! म्हणून सर्वोदय राजनीती ऐवजी लोकनीती चाहतो.

राजनीतीत जेथे मुख्य वस्तू शासन आहे, तिथे लोकनीतीत स्वयंशासन व अनुशासन आहे. राजनीतीत नियंत्रण असते तर लोकनीतीत संयम. राजनीतीत हक्क व अधिकार आहे तर लोकनीतीत कर्तव्य आहे.

थोडक्यात; सर्वोदय शासनाकडून अनुशासनाकडे; सत्तेकडून स्वातंत्र्याकडे; नियंत्रणाकडून संयमाकडे आणि हक्क व अधिकाराकडून कर्तव्याकडे जाऊ इच्छितो. अर्थात राज्याकडून प्राज्याकडे आणि राजनीतीकडून लोकनीतीकडे सर्वोदयाची वाटचाल आहे.

लोकांना केवळ सुशासनासाठी नव्हे तर स्वयंशासनासाठी तयार करायचे आहे. त्यासाठी विकेंद्रित सत्ता गावोगावी वाटली गेली पाहिजे. प्रेम व अहिंसेची लोकात भावना निर्माण केली पाहिजे, तरच लोकनीती येईल.

## 9.सहकार, असहकार आणि प्रतिकार

साध्या इतकेच साधन देखील शुद्ध असले पाहिजे हा सर्वोदयाचा आग्रह आहे.समाज- परिवर्तनाच्या प्रयोगात वेळोवेळी समाजाला, शासन व सत्ता यांच्याशी संघर्ष करण्याची वेळ येणारच. अशावेळी संघर्षाचे साधन, असहकार आणि प्रतिकार हे आहे.

जनतेला असहकाराचे शिक्षण दिले गेले पाहिजे. असहकाराने जिथे भागणार नाही तिथे प्रतिकार करण्यास हरकत नाही. प्रतिकार म्हणजे जनतेने विनयपूर्वक, शिस्तीने, उघडपणे व सरळपणे, दृढ निश्चयपूर्वक अन्याय्य कायद्याचा भंग करावयाचा आणि त्यासाठी मिळणारी शिक्षा आनंदाने व द्वेषभाव उत्पन्न होऊ न देता स्वीकारायची. अशा प्रकारचे शिक्षण जनतेच्या जीवनात मुरलेले असले पाहिजे. त्यासाठी शिक्षणात आणि राष्ट्रीय नीतिशास्त्रात असहकार व प्रतिकाराला नित्य स्थान असले पाहिजे.

सहकार, असहकार आणि प्रतिकार यांच्या मर्यादा ओळखून, अहिंसापूर्वक यथाप्रसंगी त्याचा अवलंब करू शकण्याइतकी जनता जागृत असणे किंवा राखणे हे उत्तम राज्यव्यवस्थेचे अंगच समजले पाहिजे.

## 10.सत्याग्रह-विचार

सत्याग्रह ही एक जीवन-पद्धती तसेच एक कार्य-पद्धती आहे. आणि विशिष्ट प्रसंगी उपाय- पद्धतीही आहे. सगळ्या जीवनचर्येत सत्यावर निष्ठा ठेवणे म्हणजेच सत्याग्रह! सत्याग्रहात 'सत्य' महत्त्वाचे आहे, 'आग्रह' नाही.

'सत्याग्रही' बनण्यासाठी प्रथम 'सत्यग्राही' म्हणजे सत्याचे ग्रहण करणारा बनणे गरजेचे आहे. सत्यग्राही झाल्याशिवाय सत्याग्रही होता येणार नाही. आपल्या पक्षाकडे सत्य आहे असे मानावे, परंतु प्रतिपक्षापाशी जे सत्य असेल त्याचे ग्रहण केल्याशिवाय त्याच्या हृदयात प्रवेश होऊ शकत नाही. सत्याग्रहात प्रतिपक्षाबद्दल प्रेम असले पाहिजे. त्याच्या द्वेष करणे चुकीचे आहे. चित्तातून द्वेष काढून टाकणे ही पहिली गरज आहे; तेव्हाच सत्याग्रहात शक्ती येईल.

स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय सत्तेशी लढताना तीव्र, तीव्रतर व तीव्रतम 'संघर्षशील सत्याग्रह' योग्य होता. पण आता स्वकियांसमोर सत्याग्रह करायचा असल्याने; प्रतिपक्षाला सहाय्य करीत सौम्य, सौम्यतर व सौम्यतम सत्याग्रह केला पाहिजे. 'संघर्षशील सत्याग्रहा'च्या जागी आता 'सहयोगी सौम्यतम सत्याग्रह' असावयास हवा.

सत्याग्रहात समोरच्यावर दबाव नव्हे तर प्रभाव पडला पाहिजे.अन्यथा वरून दिसणारे सत्याग्रह व उपवासासारखे अहिंसक शस्त्रही हिंसक बनेल. फक्त तलवारीनेच हिंसा होते असे नाही अनुचित सत्याग्रह व उपवासानेही हिंसा होऊ शकते

## 11. अर्थ-विचार

लक्ष्मी आणि पैसा यात भेद आहे. स्व-श्रमाने शेतातून निर्माण होते ती लक्ष्मी. लक्ष्मीचे मूल्य कायम असते. एक किलो धान्यात पूर्वी होती तेवढीच पोषणशक्ती आजही आहे. पैसा लफंगा आहे. त्याची किंमत कमी अधिक होत राहते.

पैशाने चोरी सुलभ होते. खेड्यात सर्व गोष्टी श्रमाने निर्माण होतात आणि शहरवाले पैसे देऊन ते घेऊन जातात. बंदूक दाखवून एखाद्याची वस्तू घेऊन जाणे जशी चोरी, तसेच नोट दाखवून वस्तू घेऊन जाणे हीदेखील चोरीच आहे.

अस्तेय आणि असंग्रह मिळून अर्थशुध्दी होते. स्तेय म्हणजे चोरी. श्रमाशिवाय संपत्ती मिळवणे ही चोरीच होय. अस्तेय म्हणजे चोरी न करणे. संग्रहाबरोबरच अनुत्पादक व्यवसाय (व्याज, भाडेपट्टी, दलाली इत्यादी व्यवसाय) यांचे निराकरण केले पाहिजे. संपत्ती कशी मिळवायची व किती मिळवायची, हे अस्तेय व असंग्रह व्रते सांगतात.

संग्रह करणारा चोराला जन्माला घालतो. गरजेपेक्षा अधिक संग्रह करणे पाप आहे.सर्वांचे पोट भरले पाहिजे, मात्र पेटी भरण्याचा अधिकार कोणालाही नाही. हा निसर्ग सर्वांची भूक भागवू शकतो, पण एकाची हाव भागवू शकत नाही.

नैतिक मूल्यात जर भेद नाही तर आर्थिक क्षेत्रातही भेद राहता उपयोगी नाही.नैतिक मूल्याप्रमाणेच आर्थिक क्षेत्रातही श्रमाचे मूल्य समानच मानले गेले पाहिजे.शारीरिक श्रमाला व बौद्धिक श्रमाला समान प्रतिष्ठा व समान मूल्य दिले गेले पाहिजे. हाताची सर्व बोटे

सारखे काम देत नाहीत. एका बोटाने जे काम होते ते दुसऱ्या बोटाने झाले नाही तरी, सगळी बोटे समान असतात. याच प्रमाणे समाजातील प्रत्येकाची सेवा भिन्न प्रकारची असली तरी तिचे आर्थिक मूल्य मात्र समानच असले पाहिजे.

धनाचे द्रव्यात रूपांतर झाले पाहिजे. एका जागी राहते ते 'धन' आणि वाहते ते 'द्रव्य'.धन आणि द्रव्य हे दोन शब्द कळले की अर्थशास्त्र हाती येते. धनाचे रूपांतर द्रव्यात करण्यानेच ते समाजाच्या कामी येईल. अस्तेय, असंग्रह, अपरिग्रह, त्याग, दान याद्वारे धनाचे रूपांतर द्रव्यात होऊ शकते.

संपत्तीची मालकी हीच आर्थिक विषमता व सामाजिक दुःखाची जननी आहे. म्हणून मालकी तत्त्वच बाद झाले पाहिजे.बुद्धी, शक्ती व पुरुषार्थ ही धनार्जानाची प्रमुख साधने ईश्वराने मानवाला दिलेली आहेत. एवढेच काय हा देह देखील आपला नसून परमेश्वराने दिलेला आहे. म्हणून व्यक्तीची संपत्ती ही केवळ त्याच्या उपभोगासाठी असूच शकत नाही. ती संपत्ती समाजाच्या उपयोगासाठी ईश्वराने त्याच्याजवळ ठेव म्हणून ठेवली आहे. मालमत्तेचा स्वामी परमेश्वर आहे व आपण फक्त विश्वस्त आहोत.हा विचार स्वीकारल्यास, मालकी-तत्त्वाने निर्माण झालेल्या दुःखातून आपली सुटका होईल.

भूदान, ग्रामदान, संपत्तिदान, समयदान, जीवनदान व विश्वस्त-भावना याद्वारे मालकी विसर्जनाची कल्पना मूर्त-स्वरूपात येऊ शकते. दानाचा उद्देश स्वामित्व-विसर्जनाची दीक्षा देणे हा आहे. अर्थशुध्दी, व्यवहारशुध्दी हे महत्त्वाचे आहे.

मनुष्य जसजसा सुसंस्कृत होत जाईल तसतशी संग्रह-वृत्तीची त्यालाच लाज वाटू लागेल. पूर्वीच्या काळी राजांना कितीतरी राण्या

असत; त्याची लाज वाटणे दूरच राहिले त्यात प्रतिष्ठा मानली जाई. आणि आज, एखाद्याला दोन बायका असल्या तर तो बिचारा खाली मान घालून स्पष्टीकरण देऊ लागतो.आज एवढा फरक झाला आहे व समाजाची मानसिकता बदलली आहे. याचा अर्थ असा की काम-नियमनाचे प्रयोग खूप झाले. आता अर्थनियमनाचे प्रयोग करायचे आहे.काही दिवसांनी असे होईल की आपल्या जवळ जास्त जमीन आहे, पैसा आहे हे सांगायची माणसालाच लाज वाटेल!

## 12.संरक्षणनीती

संग्रह करणाराच चोराला जन्माला घालतो. या संग्रह-वृत्तीतूनच सामाजिक व आर्थिक विषमता निर्माण होते. विषमतेतून दारिद्र्य, दारिद्र्यातून वर्गसंघर्ष, वर्गसंघर्षातून हिंसा: असा हा क्रम आहे. परिणामी देश दुर्बल होऊन त्याचा फायदा समाज-विघातक व परकीय शक्ती उठवतात. तेव्हा खरा शत्रू; संग्रहवृत्ती, मोह, दारिद्र्य, अज्ञान आणि जातिभेद हेच आहेत. या शत्रूंचा बीमोड करून, स्वतःचे व देशाचे संरक्षण करायचे असेल तर; जमिनीचे न्याय्य वितरण; मालकी-विसर्जनाचा विचार; ग्रामोद्योगाद्वारे प्रत्येकाच्या हाताला काम; आंतरजातीय विवाह आणि एकादश-व्रताचे पालन हे करावे लागेल. आमचे रक्षण; पोलीस, कायदे व कोर्ट यामुळे नव्हे तर एकादशव्रताने होऊ शकते.

सर्वोदयाचा विचार अहिंसेचा आहे.असे असले तरी अहिंसक-शक्ती पुरेशी विकसित होत नाही तोपर्यंत,परकीय-आक्रमण व देशांतर्गत हिंसक उद्रेक थोपविण्यासाठी सैन्य व पोलिसांकरवी; निर्वैर-वृत्तीने सशस्त्र प्रतिकार हा आपद्-धर्म ठरतो !!

शस्त्रांमुळे आपले संरक्षण होऊ शकेल ही समजूत चुकीची आहे. प्रश्न तेव्हाच सुटतील जेव्हा आपण नि:शस्त्रीकरण करू. सूर्याची किरणे पसरली की सर्व लोक आपली अंथरुणे गुंडाळतात. ज्यांनी अंथरुणे घातली होती तेच लोक ते गुंडाळतात. त्याचप्रमाणे ज्यांनी शस्त्रास्त्रे तयार केली आहेत त्या लोकांच्या जेव्हा लक्षात येईल की शस्त्रांनी प्रश्न सुटणार नाहीत, तेव्हा ते शस्त्रांचा नाश करतील व अहिंसेच्या मार्गाने स्वतःचे संरक्षण करतील.

# 13.धर्म-विचार

आज जगात धर्मसंस्था शक्तिशाली झाली आहे. लोकसेवेच्या हेतूने उभी केलेली धर्मसंस्था हीच समाजासाठी समस्या बनली आहे. व म्हणूनच धर्म-संस्थेतून समाजाला सोडविण्याची गरज उत्पन्न झाली आहे.

विनोबा म्हणतात की, आज आम्ही ज्यांना धर्म म्हणतो ते वास्तविक धर्म नाहीत. त्या फेथ् अर्थात श्रद्धा आहेत. कोणा एका माणसाला सत्याचा साक्षात्कार झाला, त्याच्यावर ज्यांनी श्रद्धा ठेवली ते लोक त्या श्रद्धेचे झाले. आज जे धर्म प्रचलित आहे ती श्रद्धा आहे. हे धर्म नसून पंथ आहेत. पहिली पावले टाकण्यासाठी हे सगळे पंथ निर्माण झाले आहेत. खऱ्या मानवधर्माचा सूर्य उगवत नाही तोपर्यंत धर्म- पंथांच्या या दिवट्या राहतील.

धर्मसंस्था आम्ही; पुजारी, पुरोहित, मुल्ला, पादरी यांच्या ताब्यात दिल्या आणि धर्माला या संस्थांच्या तुरुंगात ठेवले. म्हणून आता धर्माला मंदिर, मशीद, चर्च तसेच पादरी, पुरोहित, मुल्ला यांच्या कैदेतून मुक्त करायचे आहे; आणि खरी धर्मभावना सर्वत्र पसरावयाची आहे.

गीता, कुराण, बायबल यांना विनोबांनी 'धर्मग्रंथ' न मानता 'आध्यात्मिक-ग्रंथ' मानले व या ग्रंथांची धर्माच्या कैदेतून मुक्तता केली.

जुनाट धर्म आणि धर्माच्या नावाने चालणारे अधर्म आता विज्ञान युगात टिकणार नाहीत. आता धर्म जेव्हा विज्ञानाच्या भूमिकेवर येईल तेव्हाच खरा धर्म बनेल.बुद्धीच्या कसोटीवर कसला

जाणारा, मानसिक कल्पना-कामनांच्या वर गेलेला व जगातले सगळे भेदभाव- उपासने सकटचे भेदभाव- काढून टाकणारा धर्म यापुढे टिकेल. व्यापक भावना म्हणजे धर्मभावना. विज्ञानयुगात व्यापक भावना टिकेल.

विनोबा म्हणतात की, आज धर्म व व्यवहार यांची फारकत झाली आहे. शंकराचार्यांच्या मठात धर्माने जरूर रहावे पण, राजकारणाच्या मंडपाचा त्याला विटाळ असता कामा नये. व्यवहाराची सर्व नाकी धर्माने काबीज केली पाहिजेत.अगदी व्यापाराच्या दुकानात देखील धर्माने प्रवेश केला पाहिजे. धर्म आणि अर्थ हे बरोबर चालत असतात. जो धर्म संपूर्ण अर्थाचे नियमन करू शकत नाही, तो खरा धर्म होऊ शकत नाही.त्याचप्रमाणे जो अर्थ धर्मबुद्धीला टिकवून ठेवू शकत नाही, तो खरा अर्थही नाही. म्हणून धर्म व अर्थ यात विरोध होऊ शकत नाही.धर्माची आणि व्यवहाराची जोडी कधीच फुटता कामा नये. या दोहोंची नेहमी सांगड घातली गेली पाहिजे. धर्मभावना मंदिरात प्रकट होते व व्यवहारात तिची आवश्यकता मानली जात नाही ही विनोबांना मोठी चूक वाटते.

कुठलाही धर्म असो; त्याला मानणा-यांनी धर्माला सत्तेशी जोडण्याचा विचार सोडून दिला पाहिजे. दोघांना जोडल्याने धर्माची आणि राज्याची दोघांचीही हानी होईल. धर्माचा विकास करायचा असेल तर त्याला सत्तेशी व राज्याशी जोडू नका, असे विनोबांचे सांगणे आहे.

पूर्वी मंदिराच्या सभोवती धर्म उभा राहत असे. तसेच या युगात ग्राम-मंदिराच्या सभोवती धर्मभावना एकत्र झाली पाहिजे, हा आजच्या युगाचा धर्म आहे. मनुष्याच्या हृदयात ईश्वर आहे त्याची उपासना करायची आहे आणि पूर्ण गावाला मंदिर बनवायचे आहे.

## 14.अध्यात्म-दृष्टी

विनोबा, धर्म व अध्यात्म यात फरक करतात. धर्म, बाह्य गोष्टींचा आदेश देतो. धर्मात सामान्यतः परमात्मदर्शन, उपासनापद्धती, कथा, कायदे व नीती या पाच गोष्टी असतात व स्थळकालानुसार धर्माच्या या पाच गोष्टी व धर्मही बदलत असतो.

अध्यात्म सर्वत्र एकच असते.विनोबांनी अध्यात्माची व्याख्या,"सत्य प्रेम करुणा" अशी केली आहे. विनोबा अध्यात्माचे पाच अंश सांगतात. (१) निरपेक्ष नैतिक मूल्यांवर श्रद्धा. (२) जीवनाची मरणोत्तर अखंडता. (३) प्राणिमात्रांची एकता व पावित्र्य. (४) विश्वात व्यवस्था व बुद्धी असणे. (५) पूर्णतेचा अनुभवाची संभवनीयता.

विनोबा; गीता, कुराण, बायबल इत्यादींना धर्मग्रंथ न मानता, आध्यात्मिक-ग्रंथ मानतात. म्हणूनच प्रत्येकाने या आध्यात्मिक ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे. यातच सर्वधर्मसमभाव सामावला आहे.

मनुष्याला अध्यात्माकडे घेऊन जाण्यासाठी धर्म आहे. धर्म आणि अध्यात्म, दोन्ही एकाच वस्तूकडे जातात. परंतु सामान्य लोकांना रस्ता माहीत नसतो, म्हणून धर्म त्यांना हळू-हळू तिकडे घेऊन जातो. अध्यात्म एकदम प्रकाशाचा झोत टाकतें. सत्य काय, हे अध्यात्म एकदम सांगते. धर्म मनुष्याला आंधळा समजून, त्याचा हात धरून त्याला हळू-हळू घेऊन जातो. रस्ता दाखवतो. मुल्ला-मौलवींच्या, गुरूंच्या मागे जायला धर्म शिकवतो. अध्यात्म म्हणतें - तुम्ही आणि ईश्वर यांच्यामधे आणखी। कोणीहि नाही.

## 15.वैज्ञानिक-दृष्टी

विज्ञानात विनाशक आणि विकासक शक्ती आहे. विज्ञान सेवाही करू शकते आणि संहारही करू शकते. कारण विज्ञान नैतिक अथवा अनैतिक नाही, तर विज्ञान नीतिनिरपेक्ष आहे.व म्हणूनच विज्ञानाला मार्गदर्शकाची गरज आहे. व ते अध्यात्म देऊ शकते.

विनोबांनी अध्यात्माची सुटसुटीत व्याख्या 'सत्य प्रेम करुणा' अशी केली आहे.अध्यात्म आणि विज्ञान यांच्या समन्वयाने सर्वोदय होत असल्याने; विनोबा सर्वोदयाची सूत्रमय गणिती व्याख्या,"अध्यात्म+विज्ञान=सर्वोदय" अशी करतात.

सत्ताधारी व भांडवलदार यांच्या आश्रयाने विज्ञान वाढू लागले तर, मानवावर नव्हे तर खुद्द विज्ञानावरही संकट येईल.विज्ञान आणि हिंसा परस्पर विरुद्ध आहेत. एकमेकांबरोबर ते टिकूच शकत नाही. विज्ञानाला रहावयाचे असेल तर त्याला हिंसा नष्ट करावीच लागेल. अन्यथा मनुष्य व विज्ञान दोन्हीही नष्ट होतील.

धर्म आणि राजनीतीचे दिवस आता संपले आहेत. आता विज्ञान आणि अध्यात्म या दोन शक्ती काम करणार आहेत. विज्ञान-युगात अध्यात्म मार्गदर्शन करेल आणि विज्ञान गती वाढवेल. अशा तऱ्हेने दोघांच्या मदतीने जीवन चालेल.

अहिंसेशिवाय शोषणमुक्त समाजाची स्थापना होऊ शकत नाही. आणि विज्ञानाच्या अभावी सर्वांना रोजगार मिळणे जवळजवळ अशक्य आहे.विज्ञान रोजगार वाढवू शकतो, परंतु विज्ञानात शोषण कमी करण्याची क्षमता नाही. ही क्षमता अध्यात्म व अहिंसेत आहे.

## 16.जातिअंत

विनोबांनी म्हटले आहे की; कताई, बुनाई, शिलाई, सेवा इ. क्षेत्रे स्त्रियांसाठी आरक्षित असली पाहिजेत. विनोबांचा या मागणी मागचा अर्थ हाच आहे की, स्त्रियांना व दुर्बळ घटकांना आरक्षणाद्वारे वाव देऊन, आर्थिकदृष्ट्या सक्षम व आत्मनिर्भर केल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकत नाही. व म्हणूनच विनोबा दुर्बल घटकांसाठी आरक्षणाची मागणी करतात.

समाजाने दलितांना जी हीन कामे करावयास भाग पाडली, ती हीन पण समाजोपयोगी कामे पश्चाताप बुद्धीने उच्चवर्णीयांनी करावीत व याद्वारे दलितांशी संबंध जोडून त्यांचे प्रश्न समजावून घ्यावेत व ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने दलितांचे सबलीकरण करावे त्यांना आत्मनिर्भर करावे त्यांच्यात अन्यायाविरुद्ध लढण्याची हिम्मत निर्माण करावी. यासाठी गांधी- विनोबांनी; मृतगुरांचे शवच्छेदन, भंगीकाम, कुंभारकाम,विणकाम, तेलघाणी, नीरा उत्पादन,कुष्ठसेवा इत्यादी कामे उभी केलीत. या कार्याद्वारे जातिअंताकडे एक पाऊल पुढे टाकले गेले.

## 17.संस्था व संघटना

विनोबा म्हणतात की, घटनेने बध्द असलेली संस्था विचार-क्रांती करेल ही अपेक्षाच चुकीची आहे. विचार-क्रांती मनुष्यद्वारे होते. संस्थेत फक्त 'मेंबर' असतात.त्यात कुणी देणगी देऊन मोकळे होतात; कोणी धनिकांना मेंबर बनवून कृतकृत्य होतात; काही कार्यालय सांभाळतात.अशा स्थितीत कोणीच विचार करू शकत नाही. त्यामुळे संस्थेद्वारे विचार-क्रांती होणे शक्य नाही.

संस्था कर्मयोगात अडकून पडतात व विचारप्रक्रिया कुंठित होऊन त्या संस्था आपले प्राणतत्त्व गमावून निस्तेज बनतात.धनसंचय व त्याच्या व्याजावर संस्था चालविण्याची वृत्ती, यामुळे संस्था विचाराचे वाहक होऊच शकत नाही. संस्था चालवायच्याच असतील तर, धनाच्या बळावर नव्हे तर श्रमाच्या आधारावर चालल्या पाहिजे.कांचनमुक्तीच्या आधारे संस्था चालल्या तरच त्यांच्यात चैतन्य संचारेल व खऱ्या अर्थाने त्या ग्रामसेवा करू शकतील. तसेच संस्थेचे निर्णय बहुमताने न होता एकमताने वा सर्वसंमतीने व्हावे, असेही विनोबांचे म्हणणे आहे.

विनोबांना एखाद्या कुटुंब व परिवारासारखी 'सहज' संघटना हवी आहे.जिथे सगळे बंधुभावाने एकत्र येतात; स्थूल संबंधांना गौण मानतात; मतापेक्षा मनुष्याला आणि बाह्य कर्मापेक्षा आंतरवृतीला महत्त्व देतात; मनुष्याला मनुष्य म्हणून ओळखतात, अशा 'सहज' संघटनेत कल्याणकारीशक्ती निर्माण होते.

विनोबांचा विश्वास व्यक्तीवर आहे, संघटना व संस्थेवर नाही. संस्था वा संघटना म्हटली की त्यात नियोजन आणि नियंत्रण आले व अंमलबजावणीत सत्ता आली. जेथे सत्ता आहे तेथून अहिंसा व

सत्य पळ काढते. त्यामुळे संस्था व संघटनेत हिंसा व असत्याला चंचुप्रवेश मिळतो. अशा स्थितीत संस्था व संघटनेद्वारा शासनमुक्त समाजा-रचना निर्माण होणे अशक्य आहे.

विचारांना मूर्तरूपदेण्यासाठी संस्था व संघटना निर्माण झाल्या असल्या तरी विनोबांना दोघात मूलभूत फरक दिसतो. संघटना नीट चालली तर विचाराला मूर्तरुप देऊ शकते ;पण जर न चालली तर विकृत रूपही येते. संस्था विचाराला मूर्तरुप देतात. संस्था चांगली चालल्यावरही ती यम-प्रधान न राहाता नियम-प्रधान बनते.

अर्थात याचा अर्थ असा नव्हे की सर्वोदयाच्या विचारात संस्था व संघटना बसत नाहीत अथवा सर्वोदयाचा त्याला विरोध आहे. जोपर्यंत शासनमुक्त अहिंसक समाज-रचनेचा विचार समाजात रुजत नाही व तो विचार विकसित होत नाही तोपर्यंत संस्था व संघटनेच्याच आधाराने शासनमुक्त समाज-रचनेचा विचार लोकात पसरावा लागेल.

सर्वोदयी संस्था व संघटना यांच्यात भावनिक, वैचारिक आणि व्यावहारिक नाते असले पाहिजे. संस्था व संघटना परस्परावलंबी आणि परस्परपूरक आहेत. संस्था किल्ले आहेत, तर संघटनाचे कार्यकर्ते हे वैचारिक राज्यविस्तारच्या मोहिमेला निघालेले सैन्य आहे.संस्थांनी संघटनेला वैचारिक व वेळप्रसंगी आर्थिकही रसद पुरवली पाहिजे. तसेच सैनिकांची सर्व प्रकारची व्यवस्थाही केली पाहिजे.हेच विनोबांनी दिलेल्या उदाहरणाने सांगायचे तर जात्याचे एक पाळे स्थिर असते व दुसरे फिरते राहते म्हणूनच त्यातून पीठ निघते.संस्था स्थिर आहे तर संघटना फिरती आहे. असे झाले तरच त्यातून सर्वोदय विचाराचा प्रचार होईल.

## 18.कार्यकर्ता

सर्वोदय विचार व या विचाराचा पाया असलेला 'एकादश-व्रतां'चा संदेश, कार्यकर्त्याने निष्ठापूर्वक घराघरात पोहोचवायचा आहे.यासाठी त्याने स्वतः अध्ययन केले पाहिजे आणि साहित्य-प्रचारही केला पाहिजे.

स्वाध्याय म्हणजे केवळ ग्रंथांचा अभ्यास नव्हे. स्वाध्याय म्हणजे 'स्व'चे अध्ययन. म्हणजेच आत्मपरीक्षण.हॉटेलवाला इतरांना खाऊ घालतो पण ते अन्न स्वतः खात नाही, तसे सर्वोदय साहित्य-प्रचाराबाबत होऊ नये. कार्यकर्त्याने स्वतः सर्वोदय-साहित्याचे अध्ययन करावे, त्यातील विचार जीवनात मुरवावे व मगच त्याचा प्रचार करावा. तरच साहित्य प्रचारकाचा व प्रचाराचा प्रभाव समाजावर पडेल.

कार्यकर्त्यात स्वाभिमानी-वृत्ती कर्तृत्व-शक्तीने व स्वावलंबनाने येते. मिताव्ययपूर्वक जीवन-निर्वाहाने कार्यकर्ता स्वावलंबी बनतो. कार्यकर्ता जनाधारित असावा. कार्यकर्त्याने समाजाची जास्तीत जास्त सेवा करून समाजाकडून शरीरधारणापुरते कमीत कमी घ्यावे. व तेही उपकृत भावनेने घ्यावे.हा मोबदलाही घेतला नसता. पण शरीराचे चालत नाही म्हणून हा मोबदला घ्यायचा व तोही हक्काने नव्हे तर नाइलाजास्तव म्हणून घ्यावा. कार्यकर्त्याने स्वतःचे शरीर-रक्षण व  शरीर-पोषण हे सामाजिक कार्य समजले पाहिजे.

विनोबा केवळ सर्वोदयाचे तत्त्वज्ञान सांगून थांबले नाहीत तर, हे तत्त्वज्ञान व्यक्तीच्या व समाजा-जीवनात उतरवण्याचे काही उपक्रमही त्यांनी दिले. संपत्तीच्या न्याय्य-वितरणासाठी 'भूदान', मालकी-विसर्जनासाठी 'ग्रामदान', शांती स्थापनेसाठी 'शांतिसेना', देशाच्या एकतेसाठी 'देवनागरीलिपी'चा आग्रह, समाजाच्या मार्गदर्शनासाठी 'आचार्यकुल', सर्वधर्म समभावासाठी गीता, बायबल, कुराण इ. धार्मिक ग्रंथांना 'अध्यात्मिक' ग्रंथ मानण्याची दृष्टी, जनसंपर्कासाठी 'सर्वोदयपात्र', राजकारणाला पर्याय 'लोकनीती' इत्यादी उपक्रम दिलेत तसेच गोवंशहत्याबंदीसाठी स्वतः उपोषण, सत्याग्रह करून 'सौम्यतम सहयोगी सत्याग्रहाचे उदाहरण घालून दिले, एक आणा आहार प्रयोग व कांचनमुक्तीच्या प्रयोगाद्वारे 'अर्थनीती'ची दिशा दाखवली, चंबळच्या डाकूंना सद्-मार्गावर आणून' हृदय-परिवर्तन' होऊ शकते हे सिद्ध केले, पशुबळी दिल्या जाणाऱ्या मंदिरात न जाण्याचा आग्रह धरून 'अंधश्रद्धे'ला धक्का दिला. या सर्व उपक्रमाद्वारे व स्वतःच्या कृतीद्वारे विनोबांनी सर्वोदय-विचार समाज-जीवनात उतरवून दाखविला व तो व्यवहार्यही आहे हे सिद्ध केले.

जय जगत्

संदर्भ-ग्रंथ

-

1) विनोबा साहित्य ( खंड 1-20)

2) आधुनिक भारतातील राजकीय विचार

-भा.ल.भोळे

## आचार्य विनोबा भावे जन्मस्थान प्रतिष्ठान

मु.पो.गागोदे बुद्रुक,या.पेण,जि.रायगड-
402 107



विनोबांच्या जन्मघराचे स्थानमहात्म्य जाणून 1955 सालापासून येथून सातत्यपूर्वक सर्वोदयाचे कार्य सुरू आहे.

विनोबांचे विचार व कार्य हेच त्यांचे जीवंत स्मारक आहे, ही दृष्टी ठेवून जन्मस्थानाचे प्रचलित स्वरूपात स्मारक न करता; पूर्णवेळ जीवनदानी कार्यकर्त्यांनी तेथे राहून श्रमाधारित जीवन जगावे व स्वपरिवर्तनातून समाज-परिवर्तन या दिशेने व विचाराने सर्वोदयाचे कार्य करावे हेच संस्थेचे धोरण आहे.

शेती, गोशाळा, ग्रंथ-भांडार इत्यादी कार्यही सुरू असते.

संपर्क : नीला आपटे,अध्यक्ष

मोबाईल -9405924226

ई-मेल: vinobajanmsthan@gmail.com

https://www.vinobabhave.org.

## **श्रीकोटेश्वरदेव (ट्रस्ट), वाई**

1038/3 ब्राह्मणशाही,मु.पो. वाई, ता.वाई,

जि. सातारा - 402 803



आचार्य विनोबा भावे यांचे वाई ( जि. सातारा ) जसे मूळगाव आहे, तशीच वाई त्यांची तपोभूमीही आहे.

वाई येथील कोटेश्वर मंदिराशी भावे कुटुंबाच्या कर्तृत्ववान तीन पिढ्यांचा संबंध राहिला आहे. तसेच कोटेश्वर मंदिराला सामाजिक सुधारणेचा इतिहास आहे.

1870 च्या सुमारास विनोबांच्या आजोबांनी, शंभुराव भावे यांनी हे मंदिर बांधले. त्या सनातनी काळात ते या मंदिरात मुस्लिम गवयाचे गाणे ठेवीत.1929 साली विनोबांचे वडिल नरहरपंतांनी; म.गांधीं व जमनालाल बजाज यांच्या मार्गदर्शनाने हे कोटेश्वर मंदिर अस्पृश्यांना खुले केले.अस्पृश्यांना खुले झालेले हे वाईतील पहिले मंदिर आहे! 1917 साली याच मंदिरात वर्षभर राहून विनोबांनी 'भारतमातेच्या उद्धारासाठी तपश्चर्या' केली व म.गांधीजींच्या सत्याग्रहाश्रम तत्वाचा प्रचार केला. 1953 साली

मंदिराचा रजिस्टर ट्रस्ट करण्यात आला. या ट्रस्टचे विनोबा संस्थापक विश्वस्त आहेत.

विनोबांनी लिहिलेले,"मूर्तिपूजेचे युग बदलून राहिले आहे. आता मानव-समाजाच्या रूपात भगवंताची सेवा आणि पूजा करण्याचे नवे युग आले आहे." विनोबांच्या या विचाराने ट्रस्ट कार्यरत आहे.

संपर्क: वि.प्र.दिवाण, मोबाईल – 9028321063

****

**प्रकाशक**

आचार्य विनोबा भावे जन्मस्थान प्रतिष्ठान गागोदे बुद्रुक,

ता.पेण,जि. रायगड

व

श्रीकोटेश्वरदेव (ट्रस्ट), वाई, जि.सातारा

"जेव्हां एका मंत्राची समाप्ति होते, तेव्हां परमेश्वर दुसरा मंत्र देतो व समाजाचे गाडे चालू होते. याप्रमाणे मंत्रांचे अवतार होत असतात. वास्तविक मंत्रांचे अवतार हेच खरे अवतार होत.

मंत्रांत जी शक्ति असते, ती सर्व समाजाला चालना देत असते व कांहीं व्यक्तींना विशेष स्फूर्ति देत असते. त्या व्यक्तींच्या नावाने मोठमोठी कृत्ये पार पडतात. लोक त्यांचे नांव घेऊन त्यांनाच अवतार मानतात. परंतु वास्तविक पाहतां मंत्रांचेच अवतार होत असतात.

स्वराज्याच्या मंत्राचा अवतार संपला, तेव्हां गांधीजींनी दुसरा मंत्र देशासमोर ठेवला. त्या नव्या मंत्राचे नाव आहे 'सर्वोदय'.

सर्वोदयाच्या हाती शस्त्र नसून विचार आहे व विचाराच्या साधनानेंच आम्ही शस्त्रांचा विध्वंस करूं शकतो. सर्वोदयात जी अध्यात्मिक शक्ति आहे ती प्रभाव पाडल्यावाचून राहणार नाही."

विनोबा